# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारिस रस्ता, ठाणे (प.)-४००६१०

दुरध्वनी क्र.०२२- २५८४३९००, ई मेल – thane@sra.gov.in

---

जा.क्र. मुंमप्र/झोपुप्रा/स.प्रा.ठा.४/८३३/२०२६ दिनांक : २२/१०/२०२६

## जाहीर सूचना

**विषय :- मौजे-ठाणे शहर व चेंदणी, न.भू.क्र.३८५, मौजे-ठाणे, न.भू.क्र.२०२८, २०२९ या मिळकतीवरील भारतरत्न सह.गृह.संस्थेच्या अंतिम परिशिष्ट-२ मधील सशुल्क पुनर्वसनास पात्र झोपडीधारकांनी शासन निर्णय दि.१६/०५/२०१५ नुसार दि.०१/०१/२००० पूर्वीच्या वास्तव्याचे पुरावे सादर करण्याबाबत.**

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त मिळकतीवरील भारतरत्न सह.गृह.संस्थेचे अंतिम परिशिष्ट-२ दि.२५/११/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले असून, त्यामध्ये काही झोपडीधारकांना गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय दि.१६/०५/२०१८ नुसार सशुल्क पुनर्वसनास पात्र ठरविण्यात आले आहे.

गृहनिर्माण विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.९२/झोपनि-२, दि.१२/०१/२०२४ मधील निर्देश व नागसेन नगर रहिवासी संघ यांच्या दि.०५/१०/२०२६ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने, सशुल्क पात्र झोपडीधारकांना शासन निर्णय दि.१६/०५/२०१५ मधील निकषांनुसार आपली पात्रता तपासून घेण्याची संधी देण्यात येत आहे. त्यानुसार :-

१) ज्या सशुल्क पात्र झोपडीधारकांकडे दि.०१/०१/२००० पूर्वीच्या वास्तव्याचे पुरावे उपलब्ध आहेत, त्यांनी शासन निर्णय दि.१६/०५/२०१५ मधील विहित जोडपत्र-३ व ४ मध्ये, विहित पुराव्यांसह, सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत या कार्यालयात अर्ज सादर करावा.

२) अर्जासोबत पुराव्यांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. पडताळणीवेळी मूळ कागदपत्रे दाखविणे बंधनकारक राहील.

३) अर्जावर निर्णय होईपर्यंत अंतिम परिशिष्ट-२ मधील नोंदी आहेत तशाच कायम राहतील.

४) खोटे अथवा बनावट पुरावे सादर केल्याचे आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सशुल्क पात्र झोपडीधारकांची यादी मिळकतीवरील सूचना फलकावर तसेच या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहे.

ठिकाण : ठाणे

सही/-

**(मिनल पालांडे)**
**सक्षम प्राधिकारी-४,**
**मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे**